REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# वसंतराव नाईक यांच्या योगदानाचा अभ्यास

**श्री.राजकुमार तुकाराम राठोड**
सहशिक्षक , एम.ए.एम.एड सेट (शिक्षणशास्त्र)
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लउळ क्र.1 , ता.माजलगांव जि.बीड महाराष्ट्र.

**सारांश**

वसंतराव नाईक यांच्या योगदानाचा अभ्यास यामध्ये केला आहे. वसंतराव नाईक यांचा जीवन परिचय,शिक्षण, राज्याला पर्यायाने देशाला अन्नधान्यबाबत स्वंयपूर्ण बनविणेबाबत हरितक्रांतीसाठी केलेले प्रयत्न, दुष्काळावर मात, रोजगार हमी योजना,लोकशाहीचे विकेंद्रीकरण, कृषी विद्यापीठाची स्थापना इतर शेतीविषयक योजना, समाज सेवा, त्यांचे व्यक्तीमत्व गुण इत्यादी दुय्यम साधनाचा वापर करुन अभ्यास केला. महाराष्ट्रातील सर्वाधिक काळ मुख्यमंत्री म्हणून राहिलेले ते महाराष्ट्रातील एकमेव मुख्यमंत्री आहेत. वसंतरावांनी महाराष्ट्रात हरितक्रांती घडवून योगदान दिल्यामुळे त्यांना हरितक्रांतीचे प्रणेते म्हणतात.वसंतराव नाईक यांचा जन्मदिवस महाराष्ट्रात कृषी दिन म्हणून साजरा केला जातो.


**मुख्य शब्द .** हरित क्रांती, वसंतराव नाईक, योगदान, अभ्यास

## 1. प्रस्तावना

वसंतराव नाईक म्हटले की आपल्याला आठवते हरितक्रांती. प्रत्येक माणसांची मुलभूत गरज म्हणजे अन्न. अन्नाची उपलब्धता शेतीतून होते. शेती प्रचंड प्रमाणात पिकवून अन्नाची कमतरता वसंतराव नाईक यांनी कधीच भासू दिली नाही. बंजारा समाजात जन्मास आलेले वसंतराव नाईक मध्यप्रदेशाचे, महाराष्ट्राची महसूल मंत्री व 12 वर्षे मुख्यमंत्री अशी तेजस्वी कारकिर्द निर्माण केली. एक निश्चयी करारी व शेतक–यांना प्रतिष्ठा देण्याची शपथ घेउन आयुष्यभर त्यांनी कार्य केले. महाराष्ट्रात अन्नधान्य टंचाईची समस्या निर्माण झाली. अमेरिकेसोबत भारताने PL - 480 करार केला. अमेरिकेने निकृष्ट दर्जाचे गहू पाठविले. नंतर अमेरिकेने अन्नधान्य पुरवठा करणा–या जहाज रोखून धरले. वसंतरावांनी महाराष्ट्राला अन्नधान्याच्या दृष्टीने स्वयंपूर्ण बनविले. 1972 च्या दुष्काळामध्ये लोकांच्या हाती कामे दिली. पाणी टंचाई समस्या दुर करण्यासाठी तलावे, विहिरी खोदण्याच्या योजना आखल्या. ग्रामीण जनतेला पाणीपुरवठा करण्यासाठी ग्रामिण पाणीपुरवठा योजना सुरु केली. निवासाचा प्रश्न सुटण्यास मदत व्हावी या दृष्टीने सहकारी गृहनिर्माण संस्थेची निर्मिती केली.

कापसाला किफायतशीर भाव मिळावा यासाठी कापूस एकाधिकार खरेदी योजना, दारुबंदी योजना, महाराष्ट्र राज्य लॉटरी योजना इत्यादी योजना सुरु केल्या. महाराष्ट्रात कृषी क्षेत्रात संशोधनात वाढ व्हावी. तंत्रज्ञानाचा कृषीत वापर होण्याच्या दृष्टीने कृषीविद्यापीठे स्थापन करण्यात आली. वसंतरावच्या योगदानाचा अभ्यास यामध्ये करण्यात आला आहे.

## जीवन परिचय –



वसंतराव नाईक यांचा जन्म 1 जुलै 1913 रोजी यवतमाळ जिल्हयातील पुसद तालुक्यातील गहुली या गावी झाला. वसंतराव नाईक त्यांचे आजोबा चतुरसिंग राठोड हयांनी गहुली हे गाव वसविले. चतुरसिंग तांडयाचे नायक असल्याने त्यांना सर्वजण नाईक म्हणायचे. चतुरसिंग नंतर त्यांचा मुलगा फुलसिंग हयांच्याकडे नाईकत्व आले. त्यांनी शेती व इतर व्यवसायाबरोबर समाजाच्या सुधारणेकडे लक्ष दिले आपल्या समाजाचा मागासलेपण दूर व्हावा व त्यांची भटकंती दूर व्हावी व त्यांना चांगले शिक्षण मिळावे तसेच त्यांची प्रगती व्हावी अशी त्यांना तळमळ होती.

### शिक्षण –

फुलसिंग नाईकांना राजुसिंग व हाजूसिंग ही दोन मुले होती. हाजुसिंग म्हणजे वसंतराव नाईक. वसंतराव नाईक यांचे बालपण गहूली या गावी झाले.

वसंतराव नाईक हयांचे प्राथमिक शिक्षण 1 ली पोहरा 2 री उमरी, 3 री बान्सी, 4 थी भोजला या ठिकाणी झाले. पुढील शिक्षणासाठी फुलसिंग नाईकांचे मित्र बालाजी पाटील यांनी वसंतरावला विठोलीला नेले. इयत्ता 5 वी ते 7 वी पर्यंत शिक्षण अमरावती येथे झाले. माध्यमिक शिक्षण नागपूरच्या निलसिटी हायस्कूल मध्ये पूर्ण केले. 1937 मध्ये मॉरीश कॉलेजमधून नागपूर विद्यापीठातून बी.ए.ची पदवी मिळविली. वसंतराव नाईक सामाजिक विज्ञान संस्थेत 1940 मध्ये नागपूर विद्यापीठ विधी महाविद्यालयातून एल.एल.बी. पदवी उत्तीर्ण झाले.

1941 ला अमरावती चे प्रख्यात वकील पंजाबराव देशमुख यांच्या बरोबर व नंतर पुसद येथे स्वतंत्र वकीली व्यवसाय प्रारंभ केला. परंतु वकीलीत मन रमेना समाजसेवेची व राष्ट्रसेवेची ओढ स्वस्थ बसू देईना. शेतक–यांच्या व मजूरांच्या सुखातच देशाचे व समाजाचे सुख आहे. हे त्यांना पटले शेतकरी सावकारी पैशातून कधीच मुक्त होत नव्हता शेती व शेतकरी यांचा विकास खुंटला होता आदिवासी शेतकरी व शेतमजूर अज्ञानी अशिक्षित व्यसनाधीन होता.

### विवाह –

6 जुलै 1941 ला घाटे घराण्यातील वत्सलाबाई घाटे हया ब्राम्हण पदवीधर तरुणीशी वसंतराव नाईक यांनी नोंदणी पध्दतीने प्रेमविवाह केला. नाव लिहावे स्वतःही कायद्याचे पदवीधर होते. आंतरजातीय प्रेमविवाह करुन जातपात पंथाच्या पलीकडे पाहण्याचा दृष्टीकोन काकाचे नाव लिहावे वसंतराव नाईक यांचा होता.

### हरित कांती –

वसंतरावांनी केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण देशपातळीवर कृषीक्षेत्रात केलेल्या अत्यंत भरीव कार्यामुळे त्यांचे नाव कृषीक्षेत्राशी कायमचे जोडले गेले आहे.वसंतराव नाईक यांनी आयुष्य कृषीक्षेत्राला व शेतक–यांना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी खर्ची केले. 'शेतकरी हा कारखानदार झाला पाहिजे.' हा त्यांचा ध्यास होता. व्यासपीठ कोणतेही असो वसंतराव नाईक भारतीय शेती व शेतक–यांविषयी अत्यंत तळमळीने व अभ्यासपूर्ण बोलत असत. कृषी मंत्रयाच्या व मुख्यमंत्र्याच्या परिषदेमध्ये तर त्यांचे विचार प्रभावी असायचे. तत्कालीन केंद्रीय कृषीमंत्री आण्णासाहेब शिंदे म्हणतात, "गुणवत्तेत एकापेक्षा दुसरा श्रेष्ठ असे मुख्यमंत्री होते. अशा परिषदेत सर्वात उत्कृष्ट आणि डोळयात भरेल अशी कामगिरी वसंतराव नाईकांची होत असे. वसंतराव नाईकांचे भाषण संपले की, वसंतरावाचे अभिनंदन करायची अहम ओढ त्यांना लागत असे. वसंतराव महाराष्ट्राचे प्रश्न प्रभावीपणे मांडीतच परंतु राष्ट्रीय प्रश्नावर त्यांचा भर असे. वसंतरावा इतकी तेजस्वीपणे व प्रखरतेने भारतीय शेतक–याची बाजू दुसरे कोणीही मांडू शकत नव्हते. मी महाराष्ट्राचा असल्याने व वसंतराव नाईक हेही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होताना पाहून मलाही खूप आनंद व्हायचा व माझी छाती भरुन येत असे. वसंतराव सारखा समर्थ आणि कर्तबगार मुख्यमंत्री आम्हाला लाभलेला आहे. ते आमचे सहकारी आहेत मित्र आहे याचा सार्थ अभिमान वाटत असे." वसंतराव नाईक साहेब 1963 साली मुख्यमंत्री झाले. भारताचा अमेरिकेबरोबर सवलतीच्या अटीवर अन्नधान्य घेण्याचा पी.एल.–480 हा करार झालेला होता. अन्नधान्याचा एवढा तुटवटा होता की ब–याच वेळा अन्नधान्य जहाजातून उतरवून घेतल्याबरोबर सरळ रेशन दुकानात पाठवावे लागत होते. परदेशातून आयात केलेल्या धान्यापैकी 30–35 टक्के धान्य केंद्र सरकारला महाराष्ट्राला द्यावे लागत होते.महाराष्ट्राच्या दृष्टीने गंभीर बाब होती. भारतातील अन्न प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने विशेष प्रगती होउ शकली नाही. 1966 साली भारतातील अनेक प्रांतात दुष्काळ पडला आणि भीतीचे वातावरण तयार झाले.

वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून अन्नधान्याचे आव्हान स्वीकारले राज्यभर दौरे करुन शेतक–यांना आधुनिक पध्दतीने शेती करुन संकरीत बियाण्याचा जास्तीत जास्त पेरा करुन राज्याला व पर्यायाने देशाला अन्नधान्याच्या गंभीर संकटातून बाहेर काढण्याचे कळकळीचे अवाहन केले. व्यासपीठ कोणतेही असोत वसंतराव नाईक शेती, संकरित बियाणे व शेतकरी यांचेवर जास्तीत जास्त बोलत असत. संकरित बियाण्यांचा वापर करायचे शेतक–यांना केवळ आवाहनच केले नाही तर वसंतरावांनी स्वतःच्या गहुली येथील शेतीत संकरित

बियाणांची मोठ्या प्रमाणावर लागवड त्यांनी केली. वसंतरावाच्या या धाडसी धोरणामुळे संकरित बियाण्यांचा प्रचार तडकाफडकी झाला आणि अल्पावधीतच महाराष्ट्राचे चित्र बदलले. सुरुवातीला 100 एकर जमीन संकरित बियाणांच्या लागवडीखाली होती. ती 50,000 एकरच्या पुढे गेले हे प्रमाण सतत वाढत होते. वसंतराव नाईक यांच्या प्रयत्नांना मोठया प्रमाणात यश येत होते. अमेरिकेत पी.एल. 480 कराराअंतर्गत कुरापती काढून अन्नधान्याचे जहाज रोखून धरल्याबरोबर वसंतराव नाईक पुण्याच्या शनिवार वाडयासमोर गरजले, 'महाराष्ट्र जर या दोन वर्षात अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण झाला नाही तर मला फाशी द्या.'वसंतरावांचे हे आवाहन स्विकारुन सर्व शासकीय यंत्रणा कामाला लागली. या यंत्रणेतील प्रत्येक घटकाने आपली जबाबदारी चोखपणे बजावली. महाराष्ट्र पुढे देशसुध्दा अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. विदेशातील निकृष्ट दर्जाच्या धान्याची आयात करणे बंद झाले. जी भारत देश अन्नधान्याच्या बाबतीत परावलंबी होता तो स्वावलंबी झाला. बांगलादेशाच्या युध्दाच्या वेळेस 1971– 72 साली बांगलादेशाच्या लक्षावधी निर्वासितांना भारत सरकार अन्नपुरवू शकले. भारत अन्नधान्य बाबतीत स्वयंपूर्ण झाला. ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील महत्वाची घटना आहे. हया घटनेमुळे महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या आधुनिकीकरणाला बळ मिळाले.

### दुष्काळावर मात –

1972 च्या दुष्काळावर मात करताना वसंतराव नाईक यांनी साहेबांनी जे परिश्रम घेतले त्याला तोड नाही. दुष्काळी कामाची पाहणी करताना कित्येक किलोमीटर रखरखत्या उन्हात पायी चालत असत.1972 – 73 मध्ये पडलेल्या भिषण दुष्काळात सर्व प्राणीमात्र भरडले गेले. झाडाला पाला नाही, डोंगरावर गवत नाही, जमिनीत पाणी नाही, शेतात पीक नाही, सर्वत्र रखरखत उन्हाळा, अशा गंभीर परिस्थितीत महाराष्ट्र शासनाने कामे सुरु केली. खडी फोडण्याचे काम, तलावातील कामे, विहीरीचे कामे, नाला बल्डींग, रस्ते, कालवे, धरणाची कामे, अशी अनेक कामे लोकांसाठी उपलब्ध करुन दिली. हया सर्व कामांना वसंतरावांनी स्वतः भेट दिली.

मजूरीचे दर वाढविले विद्यार्थ्यांची फी माफ केली. गेल्या 10 वर्षात घेतले नाही तेवढे विविध निर्णय एकाच वर्षात वसंतराव नाईक मंत्रीमंडळाने घेतले. लोकांनी जिद्द सोडू नये संकट जाणण्यासाठी येतात, दुष्काळ ही आपली सत्वपरिक्षा आहे त्याच वेळी पिण्याच्या पाण्यापेक्षा अन्नधान्याच्या कामतरतेने भिषण स्वरुप धारण केले होते. भूक बळी होउ नये म्हणून वसंतरावांनी प्रशासनाला व स्थानिक लोकप्रतिनिधींना सक्त आदेश दिले की, भूकबळी केवळ सरकारची जबाबदारी न समजता त्या गावातील समाजाची सुध्दा ही नैतिक जबाबदारी आहे. त्या दृष्टीकोनातून पोलीस पाटील व सरपंच हयांनीच गावातील भुकबळीसाठी जबाबदार धरले जाईल. असा फतवा त्यांनी काढला होता.शासकीय मदत मिळेपर्यंत दरम्यानचा खर्च गावाने केला तर शासनाकडून ताबडतोब भरपाई दिली जाईल असा आदेश काढला.

### रोजगार हमी योजना –

1972–73 च्या दुष्काळामधून क्रांतीकारी अशा रोजगार हमी योजनेने महाराष्ट्रात आकार घेतला. रोजगाराची हमी देणारी क्रांतीकारी योजना सुरु करणारे महाराष्ट्र हे देश पातळीवरील पहिले राज्य होते. हया योजनेचे केंद्र पातळीवर सुध्दा प्रशंसा करण्यात आले. इतर राज्यांनी सुध्दा ही योजना सुरु करावी अशा सुचना देण्यात आल्या. आज तर महाराष्ट्राची ही योजना केंद्र सरकारने जशीच्या तशी राष्ट्रीय पातळीवर नरेगा च्या नावाने सुरु केले. नरेगाचे 2 फेब्रुवारी 2006 पासून मनरेगात रुपांतरण झाले. आर्थिक अडचणीत असताना एवढी मोठी गुंतवणूक कशी करायची असा प्रश्न पडला असतानाही तत्कालीन विरोधी पक्ष नेते मा.कृष्णरावजी धुळूप व इतर विरोधी पक्ष सदस्यांनी सरकारला करवाढ करायचे सुचवून जगातील संसदीय लोकशाहीच्या इतिहासात एका नवीन घटनेची नोंद झाली. आता सर्व शासकीय, निम शासकीय कर्मचारी जे प्रोफेशनल टॅक्स भरतात, तो पैसा रोजगार हमी योजनेसाठी वापरला जाउन लोकांना त्यातून रोजगार दिला जातो.हया योजनेची चर्चा केवळ राष्ट्रीय पातळीवरच होत नसून आंतरराष्ट्रीय पातळीवरील जागतिक बॅक, आयएमएफ, युनो रोजगार संधी विषयक विभागाकडूनसुध्दा हया योजनेची विशेष दखल घेण्यात येत आहे.

### कापूस एकाधिकार खरेदी योजना –

ऑगस्ट 1972 कापूस एकाधिकार खरेदी योजना सुरु करण्यात आली. महाराष्ट हे भारतातील कापूस उत्पादक राज्य आहे. महाराष्ट्राची कापूस उत्पादकता भारताच्या कापूस उत्पादकतेचा 50 टक्के एवढी आहे. राज्यातील कापूस उत्पादकांना रास्त व किफायतशीर भाव मिळवून देणे कापसाच्या विविध प्रक्रिया जिनिंग, प्रेसिंग, सरकीचे गाळण, सूतकताई, विठाई इ.ची सांगड घालून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे पुर्नजीवन करणे हे कापूस एकाधिकार खरेदी योजनेचे वैशिष्ट्ये आहे.

### ज्वारी व तांदुळ खरेदी एकाधिकार योजना –

उत्पादित अन्नधान्याचा गरजू लोकांना वाजवी किंमतीत पुरवठा व्हावा यासाठी ज्वारी व तांदूळ खरेदी एकाधिकार योजना 1964 सुरु करण्यात आली. ज्वारीला हमी भाव देउन ज्वारी खरेदीचे धोरण वसंतरावांनी जाहीर केले. महाराष्ट्रात अडचणीत आलेला ज्वारी उत्पादक शेतकरी आर्थिक व सामाजिकदृष्टया सावरु लागला. 1975– 76 नंतर कापूस उत्पादक शेतक–याची आर्थिक व सामाजिक स्थिती बिघडत चालली आहे. सद्या राज्यात शेतकरी आत्महत्या सारखा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

### सहकारी गृहनिर्माण संस्था –

वाढत्या लोकसंख्येबरोबरच निवा–याची समस्या गंभीर असतांना वसंतरावांनी ज्यांना घर घेणे दिव्य स्वप्न होते. अशा लोकांना घर मिळवून देण्याचा प्रयत्न वसंतरावांनी केला. महाराष्ट्रात Maharastra Act No.XXIV of 1961 the Maharastra CO-operative societies Act 1960 नुसार सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन केली.लोकांना स्वतःची घरे असावित यासाठी सवलतीच्या दरात सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून कर्जपुरवठा होण्याचे मार्ग सुलभ झाले. 1972 अखेर 8677 सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या.

### दारुबंदी धोरण :

वसंतरावांनी खुल्या दारुविक्रीच्या धोरणात बदल केला. बेकायदा दारुचा धंदा करणा–या मद्यार्क व्यापा–यावर नियंत्रण आणले. दारुबंदी धोरणाबाबत वसंतराव म्हणतात, “ हे राज्य मला गुन्हेगाराचे राज्य होउ द्यायचे नाही. दारुबंदीला पर्याय निर्माण व्हायला पाहिजे आणि मानसिक परिवर्तन घडविले पाहिजे.” अजाण नागरिकाचे जीवन नष्ट करणा–या समाजकंटकाच्या कृत्यावर नियंत्रण आणण्यासाठी 1 जानेवारी 1964 ला दारुबंदीचे नवीन धोरण जाहीर केले. समाजाला दारुच्या व्यसनापासून दूर ठेवणे, दारु गाळण्याच्या धंद्यावर नियंत्रण ठेवणे हा हेतू होता.

### शैक्षणिक कार्य :

पुसद येथे लहान मुलांसाठी मॉन्टेसरी पध्दतीने शिक्षण देणारी ‘बापू बालक मंदिर’ या शाळेची स्थापना केली. गहुली गावात 1961 मध्ये माध्यमिक शाळेची स्थापना केली. आदिवासी व तत्सम समाजातील मुलांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात यासाठी सरकारच्या वतीने वसंतरावांनी आश्रमशाळा उघडण्यास प्रोत्साहन दिले. महाराष्ट्रात डोंगराळ व दुर्गम भागात शासनाच्या वतीने आश्रमशाळा बांधल्या. 1956 मध्ये अमीतचंद महाविद्यालय व पुसद येथे 1961 मध्ये फुलसिंग नाईक महाविद्यालयाची स्थापना केली.

### कृषीविद्यापीठाची स्थापना :

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी 1968, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोल 1969, बाळासाहेब सावंत कोकन कृषी विद्यापीठ दापोली 18 मे 1971,वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी 18 मे 1972 ही चार विद्यापीठे स्थापन केली. कृषी क्षेत्रात प्रगती करण्यासाठी संशोधने, नविन व्हरायटीची निर्मिती कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षण इत्यादी कार्य या विद्यापीठातून केले.

### कुटूंब नियोजन धोरण :

वसंतरावांनी कुटूंब नियोजनाद्वारे नसबंदीचा उपक्रम ग्रामीण स्तरावर राबविण्यासाठी ग्रामगौरव पारितोषीक योजना सुरु केली. कुटूंब नियोजनाचा एक भाग म्हणून शासनमान्य गर्भपातास मंजूरी दिली.

## महाराष्ट्र राज्य लॉटरी योजना :

लाखो लोक भटक्यामुळे बरबाद होत असत यातून वाचविण्यासाठी वसंतरावांनी महाराष्ट्र राज्य लॉटरीची 12 एप्रिल 1961 रोजी स्थापना केली.

## ग्रामीण पाणीपुरवठा योजना :

1972 मध्ये महाराष्ट्रात ग्रामीण पाणीपुरवठा नळ योजना सुरु केली. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची समस्या सुटण्यास मदत झाली.

## वसंतरावाची ग्रामविकासाची पंचसूत्री :

– गावाची रचना सुव्यवस्थित असावी.
– ग्रामीण भागाच्या विकासकामात सहकारी संस्था तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.
– ग्रामीण स्तरावर ग्रामस्थाने धार्मिक, सामाजिक, राजकीय, माणसा माणसात भेदभाव करु नये.
– ग्रामीण भागातील आरोग्य निरोगी असावे.
– आधुनिक शेती करण्याच्या पध्दतीवर जोर दिला पाहिजे.

वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्रातील शेती व शेतकरी यांना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. अनेक सहकारी सुतगिरण्या,सहकारी साखर कारखाने, सहकारी दुग्ध विकास संघाची निर्मिती हयांसारख्या कृषी क्षेत्राषी व शेतक–यांशी निगडीत अनेक महत्वाच्या योजना सुरु केल्या वसंतराव नाईक यांचे शेती व शेतक–यांवर निस्सिम प्रेम होते.

## लोकशाही विकेंद्रीकरण आणि ग्रामिण नेतृत्वाचा उदय.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर ग्रामीण पुनर्रचनेचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. पंचायत राज योजनेला केंद्रीय महत्व देण्यात आले. सत्तेचे विकेंद्रीकरण हा राज्यघटनेचा मुलाधार मानला गेला. 1957 मध्ये लोकशाही विकेंद्रीकरणासाठी बलवंतराय मेहता समिती नेमली.बलवंतराव मेहता समितीच्या त्रुटया व उणीवा दूर करण्यासाठी महाराष्ट्रात वसंतराव नाईक यांचे अध्यक्षतेखाली पंचायत राज अभ्यास समिती नेमली.मेहता समिती स्विकारल्या असल्या तर जिल्हाधिकारी जिल्हा परिषद चा पदसिध्द अध्यक्ष झाला असता लोकप्रतिनिधीचे अधिकार कुंठीत झाले असते. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या पंचायत राज व्यवस्थेमुळे नवे नेतृत्व उदयास येण्याची प्रक्रिया सुरु होउन लोकशाही बळकट होण्यास मदत झाली. वसंतराव नाईक यांच्या शिफारशी देशात जशास तशा स्विकारल्या आहेत.

## समाजसेवा –

शेतक–यांबरोबरच त्यांनी महार, मांग, चांभार व इतर मागास भटके, मराठा, ब्राम्हण, बनीया असा कोणताच भेदभाव होउ दिला नाही. सर्वांना पुत्रवत समजून सर्वांच्या कल्याणासाठी त्यांनी आपले आयुष्य घालविले. पण ते ज्या समाजात जन्मले त्या समाजासाठी त्यांनी विशेष असे काही केले नाही. राजकीय कार्यभारामुळे किंवा पक्षपात केल्याचा दोष माथी येईल या विचाराने त्यांनी काही केले नसावे. आरक्षण धोरणाच्या चौकटीत राहून जेवढे काही अल्पसे करता येईल तेवढेच केले.1964 बंजारा समाजाचा समावेश भटक्या जमातीत केला. त्यामुळे समाजाला अनेक सोयी सवलती मिळाल्या. जेव्हा त्यांना वेळ मिळेल तेंव्हा समाजाच्या परिषदा घेतल्या. त्यामुळे विचारमंथन घडून आले.1953 दिग्रस अखिल भारतीय बंजारा युवक परिषद भरविली.1955 खानदेशातील चाळीसगांव येथे बंजारा समाजाचे अधिवेशन घेतले. जे दुर्बल घटक असतील त्यांनी संघटनेच्या बळावर सशक्त व्हावे आणि मुळ समाज प्रवाहाला बळकट करावे ही भूमिका परिषदामध्ये मांडली ऑल इंडिया बंजारा सेवा संघ हया नावाची संघटना त्यांच्या प्रयत्नामुळे उदयाला आली.

समाज मला माझ्या आईपेक्षाही प्रिय आहे हया भूमिकेतून त्यांनी समाजसेवा केली. माणूस हा सर्वप्रथम माणूस असला पाहिजे. त्याला जातीच्या नावाखाली कमी लेखणे या सारखा असंस्कृतपण दुसरा कोणताही नाही. असा संदेश वसंतराव नाईक यांनी संपूर्ण मानव जातीला दिला.

लाख पेटविल्या ज्योती, जन ज्योर्तिर्मय झाला.
जीवनाचा क्षणच क्षण, धेयासत्व वाहिला
हे महाराष्ट्र सुपूत्रा, तुला कोटी कोटी प्रणाम.

जन्मानेच गुन्हेगार ठरवलेला बंजाराला माणूसपण बहाल केले. अंधार कोठडीतून उजेडाच्या वस्तीत आणले. गावकी गावाचे गावपण बहाल केले. कुळाचा कायदा, आश्रमशाळा काढून शिक्षणाची राहण्याच्या कपडयालत्त्याच्या सोयी केल्या.वसंतराव नाईक तुम्ही आम्हाला वा—यालाही उभे न करणा—या अभिजनाचे सोडा बहूजनातील महाजनाच्या पंगतीत बसविले.वसंतराव नाईक महाराष्ट्राच्या शब्दकोशात अडगळीत पडलेले वियुक्त भटके शब्द घटनात्मक अधिकाराची झिलई देत कायद्याच्या गोंदणात बसविले.परिस्थितीने गाजलेले, सर्वहारा बंजारा व निसर्गाने सदा प्रताडीत केलेले झोडपलेले माणूस म्हणून जगण्याचे नैसर्गिक अधिकारासाठी पारंपारिक संचितांना नाकारुन मानवीमूल्ये जोपासणा—या स्वातंत्र्य, समता बंधूत्व आणि न्याय या जीवन मूल्याचा स्वीकार करुन दिला. बंजा—याच्या मुलभूत हक्काचा कैफियत जगासमोर मांडली. इतिहासतून बंजाराचा दबलेला आवाज वर्तमानात बूलंद केला.जगाच्या क्षितीजावर मानवतेचे विचार रुंदावत गेले. परिस्थितीच्या गर्तेत भटकलेल्या दुभंगलेल्या बंजारा समाजाला प्रगतीच्या दिशेने मार्गस्थ होण्याची उमेद मनामनात जागवली. सर्व सामाजिक दुखण्यावर शिक्षण हे जालीम इलाज आहे प्रत्येक बंजारा समाजाच्या मनावर बिंबविले. शिक्षण जरी आरंभ असला तरी शेवट नसते. पुस्तके मने घडवितात माणसाला उजेडाच्या साक्षीदार बनवितात.

## निष्कर्ष:

रोजगार हमी योजनेचे जनक, जलयुक्त शिवार योजनेचे जनक,प्रधानमंत्री / मुख्यमंत्री ग्रामसडक योजने जनक,कृषी विधीपीठाचे जनक, वसंतराव नाईक होते. गोरगरीबांच्या — गरजूंच्या हाताला निश्चितपणे काम देणारी आणि सर्वाधिक लोकप्रिय ठरलेली रोजगार हमी योजना सद्याची रोजगार हमी महात्मा गांधी योजना वसंतराव नाईक यांच्या कार्यकाळात सुरु झाली. रोजगार हमी या योजनेतून असंख्य विहिरी , तलाव खोदले गेले. वसंतराव जलसंधारणाचे जनक होते. पुढे हेच काम सुधाकरराव नाईक साहेबांनी सर्वदूर पोहचवल्यामुळे त्यांना जलसंधारणाचे प्रणेते म्हणून ओळखले जाते.रोजगार हमी योजनेतून गावागावात पोहचणारे असंख्य रस्ते निर्माण केले, गावे एकमेकांना जोडली हेच कार्य पुढे अटलबिहारी वाजपेयी यांनी राष्ट्रीय स्तरावर नेले व त्याचे प्रधानमंत्री ग्रामसडक योजना असे नामकरण झाले. राज्यसरकार यालाच मुख्यमंत्री ग्रामसडक योजना म्हणते. लोकशाही विकेंद्रीकरणातून ग्रामीण जनतेला नेतृत्व दिले. आधुनिकतेची जोड मिळावी पारंपारिक शेतीला कृषी उत्पादनाच्या बाबतीत प्रगत राष्ट्राशी स्पर्धा करण्यासाठी शेतक—यांना आधूनिक तंत्रज्ञान आणि पिक पध्दतीची माहिती मिळावी यासाठी संपूर्ण देशात प्रथमच आपल्या महाराष्ट्रात एकाच वेळेस 4 कृषी विद्यापीठाची स्थापना केली. वसंतराव नाईक यांच्या कृषी विषयक धोरणामुळे महाराष्ट्रामध्ये संकरित बियाणे, जलसिंचन व आधुनिक पध्दतीने शेती हे तंत्र वापरुन हरितक्रांती घडवून आणली राज्याला पर्यायाने देशाला अन्नधान्य बाबत स्वयंपूर्ण केले ज्वारी खरेदी योजना, वसंत बांध बंधा—याची निर्मिती, 4 कृषी विद्यापीठाची स्थापना, अनेक सहकारी सूतगिरण्या,सहकारी दुग्धविकास संघाची निर्मिती यांसारख्या कृषी क्षेत्राशी व शेतक—याशी निगडीत योजना त्यांनी सुरु केल्या. आश्रशाळा, सहकारी गृहनिर्माण संस्था, नवे दारुबंदी धोरण, कुटूंब नियोजन धोरण इत्यादी महाराष्ट्र राज्य लॉटरी योजना ग्रामीण पाणीपुरवठा योजना इत्यादी. वसंतरावांचे वरील सर्व क्षेत्रात यश मिळण्याचे व महाराष्ट्र राज्याचे प्रगतीचे कारण म्हणजे वसंतरावांचे व्यक्तिमत्व गुणविशेष होय. वसंतरावांचा दृढ विश्वास, गुणवत्तापूर्वक काम करण्याची व काम करुन घेण्याची पध्दत, ध्येयनिष्ठा, दिलदारपणा, दुरदर्शीपणा, मोकळेपणा, समताभाव, शालीमता, माणूसकी, सौजन्यशिलता इत्यादी गुणविशेष वसंतराव नाईक यांच्याकडे होते. वसंतराव नाईक यांच्या योगदानाचा अभ्यास केला. वसंतराव नाईक यांना हरितक्रांतीचे प्रणेते, विकासाचा महामानव म्हणतात.

## संदर्भ सूची :


1) मधुकर भावे, महानायक, मनिष पब्लिकेशन मुंबई 2011
2) गबरुसिंह ह.राठोड, महाराष्ट्राचे शिल्पकार कालवश, राजबंजारा, औरंगाबाद 21 जून 14 जुलै 2015
3) व्ही.टी.राठोड, वसंतराव नाईक एक महामानव, राजबंजारा, 21 जून ते 4 जुलै 2015
4) अमर राठोड, जनशताब्दी महाराष्ट्राच्या महानायकाची विमुक्त नायक, दिपावली विशेषांक, 2013
5) मनोहर नाईक, प्रगतशील शेतकरी, विमुक्त नायक दिपावली विशेषांक, 2013
6) लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचलनाल, महाराष्ट्र शासन, मुंबई एप्रिल, 1964
7) लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचलनाल, महाराष्ट्र शासन, मुंबई एप्रिल, 1974
8) रमेश जाधव, वसंतयुग गोरवाणी प्रकाशन, औरंगाबाद, 2013
9) रामबिहारीसिंग बैस, वसंतराव नाईक जीवन चरित्र, अभिजात प्रकाशन, नागपूर 71987
10) Co-operative movement at a Glance in Maharastra, Commission and register of Co-operative societies, Pune,2005
11) https://www.wikipedia.org





**श्री.राजकुमार तुकाराम राठोड**
सहशिक्षक , एम.ए.एम.एड सेट (शिक्षणशास्त्र)
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लउळ क्र.1 , ता.माजलगांव जि.बीड महाराष्ट्र.